झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा/सप्रा-३/झोपुआ/५९५ /२०२१
दिनांक :२२ / ०५/२०२१.

# झोपडपट्टी निर्मुलन आदेश (पुर्वसूचना)

## महाराष्ट्र झोपडपट्टी ( सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास ) अधिनियम, १९७१ कलम ३ ड अन्वये

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे **'उक्त अधिनियम'** असा करणेत येत आहे) चे कलम ३अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१, दि. ३०/०६/२००५ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे; आणि

ज्याअर्थी, या प्राधिकरणाकडून उक्त अधिनियमाच्या कलम ३ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करणेत आलेली असून शासनाच्या मान्यतेने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि. १९/०९/२०१४ रोजी अंतिमत: प्रसिध्द करण्यात आलेली आहे; आणि

ज्याअर्थी, पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील खालील अनुसूचीमध्ये नमुद गाव पिंपरी स.नं. २३३ पै येथील गणेशनगर या नावाने ओळखल्या जाणाऱ्या झोपडपट्टी क्षेत्रावर (पूर्णत:) अंदाजे क्षेत्रफळ १३३७.६९ चौ.मी. (प्रस्तुत जाहीर प्रकटनात या मिळकतीचा उल्लेख यापुढे 'सदर मिळकत' असा करणेत येत आहे) या क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी . आणि

ज्याअर्थी, उक्त क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे. सम्यक गृहनिर्माण यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दि.०७/०१/२०११ रोजी प्रस्ताव दाखल केलेला असून सदरच्या प्रस्तावास झो.पु.प्रा. नियमावली, २०१४ यातील नियम क्र. ४(५) च्या तरतूदीनुसार दि.२७/११/२०२० रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे; आणि

ज्याअर्थी, उक्त क्षेत्रातील झोपडपट्टी क्षेत्राचे सर्वेक्षण करण्यात येऊन झोपडीधारकांची अंतिम पात्रता यादी (परिशिष्ठ २) तयार करण्यात आली असून उक्त परिशिष्ट-२ नुसार सदर मिळकतीवर एकूण १०५ झोपडया असून त्यापैकी पात्र निवासी ४५, पात्र बिगर निवासी २ या प्रमाणे एकुण ४७ झोपडीधारक पुनर्वसनास पात्र ठरले आहेत; तसेच प्रत्यक्ष जागेवर बंद झोपड्या एकूण ०१ आहेत; आणि

ज्याअर्थी, उक्त क्षेत्र दि.२९/०१/२०२० रोजीच्या आदेशाद्वारे उक्त अधिनियमाच्या कलम ३क अन्वये **झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र'** म्हणून घोषित करण्यात आले असून सदरचा आदेश महाराष्ट्र शासन राजपत्र दि.०५-११ मार्च २०२० पृष्ठ क्र. १९-२० येथे आणि विश्वेश्वर व पुढारी वृत्तपत्रात दि.१७/०२/२०२०, १७/०२/२०२० रोजी प्रसिध्द करणेत आला आहे तसेच सर्वसाधारणपणे सर्वांना ठळकपणे दिसुन येईल अशा प्रत्यक्ष जागेवर दि. २१/०२/२०२० रोजी डकविण्यात आला आहे; आणि

ज्याअर्थी, उक्त क्षेत्रावरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबत शिखर तक्रार निवारण समिती अथवा कोणत्याही न्यायालयाचा स्थगिती आदेश नाही. सबब, 'झोपडपट्टी पुनर्वसन योजना' राबविणेकामी झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्रातील इमारती / झोपडया पाडून सदरचे क्षेत्र रिकामे करणे व उक्त अधिनियमाच्या कलम ३ड अन्वये पुढील कार्यवाही करणे अनिवार्य आहे; आणि

ज्याअर्थी, विकसक मे. सम्यक डेव्हलपर्स यांचेमार्फत पात्र झोपडीधारकांचे तात्पुरते स्थलांतरण करणेसाठी भाड्याची रक्कम देण्याचे विकसक मे. सम्यक डेव्हलपर्स यांनी मान्य केले आहे.

त्याअर्थी, मी राजेंद्र निंबाळकर, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा., पुणे उक्त अधिनियमाच्या कलम ३ड मधील नमूद तरतूदीन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार खालील अनुसूचिमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाद्वारे **'झोपडपट्टी निर्मुलन क्षेत्र'** म्हणून घोषित करण्याचे प्रस्तावित करीत आहे.

उक्त क्षेत्रातील सर्व झोपडीधारकांना प्रस्तुत आदेशाद्वारे कळविण्यात येत आहे की,-

i) उक्त क्षेत्रावरील प्रत्येक झोपडी व बांधकाम या मधील झोपडीधारकांनी उक्त अधिनियमाच्या कलम १२(१) अन्वये ३० दिवसांचे आत त्यांची झोपडी रिकामी करून झोपडी व त्याखालील जागा विकसकाच्या ताब्यात द्यावी.

ii) अशा रितीने रिकामी झालेली झोपडी / बांधकाम, उक्त विकसकाने उक्त अधिनियमाच्या कलम १२(१) अन्वये या आदेशाचे दिनांकापासून ५० दिवसाचे आंत पाडून टाकून जमीन खुली करावी.

iii) उक्त अधिनियमाच्या कलम १२(८) अन्वये उपरोक्त नमूद मुदत संपण्यापूर्वी इमारत पाडून टाकण्यात आली नसल्यास इमारतीत प्रवेश करण्याचे व इमारत पाडून टाकण्याचे तसेच इमारतीतील सामानाची विक्री करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहतील.

iv) कोणत्याही झोपडीधारकाने विहीत मुदतीत त्याची झोपडी रिकामी न केल्यास / झोपडीधारकाची योजनेस संमती नसल्यास / झोपडीधारकास योजना मान्य नसल्यास असा झोपडीधारक, मग तो पात्र असो अथवा अपात्र, उक्त अधिनियमाच्या कलम ३झ अन्वये त्याचा पुनर्वसनाचा अधिकार गमावून कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहील.

v) सदरच्या आदेशाचे पालन करण्यास कसूर करणारी कोणतीही व्यक्ती उक्त अधिनियमातील कलम ३७ अन्वये, ३ महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस किंवा १००० रूपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा दोन्हीस पात्र राहील.

सदरच्या आदेशामुळे व्यथित होणा-या कोणत्याही व्यक्तीस अथवा झोपडीधारकास उक्त अधिनियमाच्या कलम ३-ड सह कलम १२ (४) अन्वये ३० दिवसांचे आत मा. शिखर तक्रार निवारण समिती, महाराष्ट्र शासन, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत,, ४ था मजला, अनंत काणेकर मार्ग, स्टेशन रोड, बांद्रा (पुर्व), मुंबई -४०००५१ यांचेकडे अपिल दाखल करता येईल आणि उक्त अपिलावरील शिखर तक्रार निवारण समितीचा निर्णय अंतिम राहील.

## अनुसूची

| गाव | स.नं. | जमीनीचे मालकी हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र ( चौ. मी.) पूर्णतः | चतु:सिमा | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| मौजे पिंपरी वाघेरे | २३३ (पै), | सरकारी (पिंपरी रिफ्युजी कॅम्प ) | १२७२.६८ चौ. मी. | पुर्वेस - डी.पी.रोड | |
| | | | | पश्चिमेस - सि.स.नं.१२७३ | |
| | | | | दक्षिणेस - डी.पी.रोड | |
| | | | | उत्तरेस - रोड,सि.स.नं.६८२८ | |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देणेत आला आहे.

(राजेंद्र निंबाळकर) (भा.प्र.से)
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

**स्थळ :-** झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
**दिनांक :-**१० / ०५/२०२१

प्रत :-

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, (भू विभाग) पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, पुणे.
२. मे. सम्यक डेव्हलपर्स (विकसक)
३. सक्षम प्राधिकारी क्र.३, झो.पु.प्रा.,पुणे, पुढील उचित कार्यवाहीकरीता.
४. मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय पुणे, यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
५. महानगरपालिका आयुक्तालय
६. सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई
७. व्यवस्थापक, मुद्राणालय, येरवडा कारागृह, पुणे-०६.
८. पोलिस आयुक्त, पुणे / पिंपरी. पुढील उचित कार्यवाही करणेकामी आवश्यक तो बंदोबस्त देण्याकरीता.
९. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी. मर्यादित.